# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 28/08/2020 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### अनैसर्गिक संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. खापा :– पो.स्टे. खापा दिनांक 02/04/2018 चे 16.23 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे अप. क्र. 73/2018 कलम 377, 323 भादवी सहकलम 4, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 02/04/2018 चे 13.00 वा. दरम्यान 12 वर्षीय पिडीत/फिर्यादी याला आरोपी नामे – गुरूदेव संतोष मालवंडे, वय 26 वर्ष, रा. नविन वस्ती खापा याने शेतात जाऊ म्हणुन सायकलवर बसवुन झाडा झुडपात नेऊन त्याला मोबाईल मधील अश्लिील व्हिडिओ दाखवून आरोपीने पिडीत सोबत अनैसर्गिक संभोग केला. पीडितने विरोध केला असता आरोपीने त्याच्या डोक्यावर विटेने मारून जखमी केले. आरोपीला दिनांक 02/04/2018 चे 18.13 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. उल्हास भुसारी, पो.स्टे. खापा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 29/08/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 7, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिने सश्रम कारावास, कलम 363 भादंवि मध्ये 2 वर्ष सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिने सश्रम कारावास, तसेच कलम 323 भादंवि मध्ये 6 महिने सश्रम कारावास व 500/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी दिपीका गवळी यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी पोहवा श्री. रमेश ताजने, पोहवा शेखर मेश्राम यांनी मदत केली आहे.

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावर येसंबा सालवा कन्हान येथे दिनांक 28/08/2020 चे 19.00 वा. ते 19.45 वा. दरम्यान आरोपी नामे – आशिष उर्फ अश्वीन सेवकराम राउत, वय 25 वर्ष, रा. सालवा येसंबा हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात मोठा चाकु घेवुन गावात दहशत निर्माण होईल अश्या स्थितीत मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा येशु जोसेफ, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रविन्द्र चौधरी 9765840242 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर